दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २३६ वा गुरूवार दि.२२ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# विभागीय नमो महारोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबिरात रोजगाराच्या संधींसह करिअरविषयी मिळणार मार्गदर्शन

**२४ फेब्रुवारी रोजी महारोजगार मेळाव्यात रोजगाराच्या संधी**
**२३ व २४ फेब्रुवारीला रोजगार, स्वयंरोजगाराबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन**



लातूर / प्रतिनिधी : राज्य शासनामार्फत लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागस्तरीय नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन शिबिरात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासोबतच रोजगार, स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये २३ व २४ फेब्रवारी २०२४ रोजी होणाऱ्या शिबिरात उद्योग, कृषीपूरक उद्योग, स्वयंरोजगार, माहिती व तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) याविषयांतील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तसेच २४ फेब्रुवारी २०२४ रोजी भव्य नमो महारोजगार मेळावा होणार आहे. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी युवक-युवतींनी या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी पत्रकार परिषदेत केले. लातूर येथील विश्राम भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेस खासदार सुधाकर श्रृंगारे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. लातूर येथील बार्शी रोडवरील शासकीय महिला तंत्रनिकेतन समोरील मैदानात विभागस्तरीय नमो महारोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबीर होत आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ग्रीकल्चरचे महासंचालक प्रशांत गिरबने, 'सह्याद्री फार्म' या शेतकरी उत्पादक कंपनीचे विलास शिंदे, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील रोहित पंढारकर, कर विषयक तज्ज्ञ राजीव रंजन, कुणाल क्षीरसागर, एडसील इंडिया लिमिटेडचे उत्तम गायकवाड, 'करिअर कट्टा' उपक्रमातील प्रमुख मार्गदर्शक दिनेश पवार, तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ महिला, वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शन ऐकण्याची संधी युवक-युवतींना २३ व २४ फेब्रुवारी रोजीच्या करिअर मार्गदर्शन शिबिराच्या निमित्ताने मिळणार आहे.

२३ फेब्रुवारी रोजी यांचे लाभणार मार्गदर्शन दिनेश पवार, मुख्य मार्गदर्शक, करिअर कट्टा: महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'करिअर कट्टा' या उपक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. दिनेश पवार हे करिअर विषयक नव्या संधींबाबत मार्गदर्शन करणार आहेत. 'चला करिअरचा मार्ग धरू', 'युवक विश्व बदलण्याची शक्ती' आदी विषयांवरील व्याख्याते, तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक अशी त्यांची ओळख आहे. उत्तम गायकवाड, महाव्यवस्थापक, एडसील इंडिया लिमिटेड : केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालय अंगीकृत कंपनी एजुकेशनल कंसल्टेंट्स इंडिया लिमिटेड अर्थात एडसिल कंपनीचे महाव्यवस्थापक असलेले उत्तम गायकवाड यांचे मार्गदर्शन या शिबिरामध्ये लाभणार आहे. महिलांसाठी स्वतंत्र परिसंवादाचे आयोजन : करिअर मार्गदर्शन शिबिरामध्ये २४ फेब्रुवारी रोजी महिलांसाठी स्वतंत्र परिसंवाद आयोजित करण्यात अयेणार आहे. यामध्ये वैद्यकीय, शिक्षण, व्यवसाय, उद्योग, प्रशासन यासारख्या विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामिगिरी करीत असलेल्या महिलांचा सहभाग असाणार आहे. या क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी याविषयी याद्वारे मार्गदर्शन केले जाणार आहे. २४ फेब्रुवारी रोजीचे प्रमुख मार्गदर्शक प्रशांत गिरबने, महासंचालक, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ग्रीकल्चर : प्रशांत गिरबने यांना एंटरप्रेनरशिप आणि गुंतवणूक क्षेत्रातील कामाचा अनुभव आहे. तसेच बँकिंग आणि वित्तीय सेवा, व्यवसाय विकास आदी क्षेत्रांमध्ये काम केले आहे. सध्या ते मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ग्रीकल्चरचे महासंचालक म्हणून कार्यरत आहेत.

विलास शिंदे, अध्यक्ष, सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी : सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी या शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक असलेले विलास शिंदे हे २३ फेब्रुवारी रोजी करिअर मार्गदर्शन मेळाव्यामध्ये युवक-युवतींना मार्गदर्शन करतील. सन २०१० मध्ये स्थापन झालेल्या या शेतकरी उत्पादक कंपनीसोबत १० हजार शेतकरी जोडले आहेत. भाजीपाला, फळे उत्पादन आणि निर्यात करण्यासोबतच त्यापासून विविध पदार्थांची निर्मिती या कंपनीमार्फत केली जात आहे. रोहित पंढारकर, माहिती व तंत्रज्ञान तज्ज्ञ : माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात विविध नामांकित आस्थापनांमध्ये काम करण्याचा अनुभव असलेले रोहित पंढारकर यांना डाटा ॲनालिसिस, डिजिटल इमेज प्रोसेसिंग, अल्गोरिदम यामधील कामाचा अनुभव आहे. ते करिअर मार्गदर्शन शिबिरात डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय विषयी मार्गदर्शन करणार आहेत. राजीव रंजन, कुणाल क्षीरसागर, (टॅक्स बडी) : कर नियोजन, आयटीआर फाइलिंग, टॅक्स नोटिस सोडवणे आणि जीएसटी फाइलिंग विषयी 'टॅक्स बडी'चे राजीव रंजन आणि कुणाल क्षीरसागर हे मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये प्राप्तिकर, जीएसटी, भांडवली नफा आदी बाबींविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. रोजगार, स्वयंरोजगारासाठी अतिशय महत्वपूर्ण असलेल्या कर नियोजनविषयक या मार्गदर्शन सत्राचा सर्वांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षा विषयावर होणार मार्गदर्शन : स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासकीय सेवेत येण्यासा इच्छुक असलेल्या युवक-युवतींना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी करिअर मार्गदर्शन शिबिरात चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये प्रशिक्षणार्थी आयएएस, आयपीएस अधिकारी हे युवक-युवतींना मार्गदर्शन करणार आहेत.

# अजित दादांची व्होट बँक कमी झाली

पिंपरी : अजित दादा भाजपसोबत गेल्याने त्यांची व्होट बँक कमी झाली आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघात अमोल कोल्हे यांना पाडणार म्हटले, पण तेच



लोकसभेला चार जागा लढणार, अशी चर्चा आहे. त्यांच्यात प्रफुल पटेल हेच हुशार आहेत, असे वाटते.त्यांनी चार वर्षे बाकी असतानादेखील राज्यसभेवर पाठवण्यात आले. बाकी नऊ जणांना काहीच मिळाले नाही, अशी टीका रोहित पवार यांनी केली.राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आमदार रोहित पवार हे बुधवारी पिंपरी-चिंचवड दौ-यावर होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. रोहित पवार म्हणाले, निवडणुकीपूर्वी अजून दहा ते पंधरा मोठे नेते त्यांच्यावर असलेल्या दबावामुळे भाजपमध्ये सामील होतील.सध्या गृहखाते फेल झाले आहे. लोकांची घरे फोडण्यात आणि राजकारण करण्यात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस अडकले आहेत. त्यामुळे त्यांना खात्यांवर लक्ष देण्यात वेळ नाही.

# २४ फेब्रुवारीला राज्यभरात 'रास्ता रोको' करा

जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सध्या उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला रास्ता रोको करण्याचे आवाहन केले आहे.२४ फेब्रुवारीला राज्यभरात रास्ता रोको करा असे ते अंतरवाली सराटी येथे संबोधित करताना म्हणाले आहेत. सकाळी १०.३० वाजता आंदोलन सुरू करण्यास त्यांनी सांगितले आहे. मराठा आरक्षणाचा विषय संपल्यानंतर धनगर आणि मुस्लिम समाजाला आरक्षण मिळण्यासाठी आवाज उठवणार असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.राज्यातील प्रत्येक गावात रास्ता रोको करा. सकाळी १०:३० वाजता आंदोलन सुरू करा. पोलिसांनी परवानगी दिली, नाही दिली तरी आंदोलन करा. पण यावेळी जाळपोळ करू नका. शहरातील नागरिकांनी शहरात आणि गावातील लोकांनी सकाळी १०:३० ते १ आणि ज्यांना जमलं नाही त्यांनी संध्याकाळी ४ ते ७ पर्यंत आंदोलन करा. रोज आंदोलन करा. पण कुणाचीही गाडी फोडू नका. जाळू नका, पण पुढे जाऊ देऊ नका. आंदोलनाचा त्रास विद्यार्थ्यांना होऊ देऊ नका, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत.मराठ्यांचा आता शेवटचा लढा सगेसोय-यांची अंमलबजावणी करा, मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण द्या, अंतरवालीसह राज्यातील सर्व मराठा आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्या, अशा मागण्या त्यांनी पुन्हा केल्या.



सरकारने दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही. यामुळे मराठ्यांचा आता हा शेवटचा लढा आहे. हैदराबादला कुणबी नोंदीचे पुरावे सापडून तीन महिने झाले, त्याचे काय झाले, हैदराबादचे गॅझेट समितीने का घेतले नाही. २४ डिसेंबरपासून २१ फेब्रुवारीपर्यंत समितीने काय केले, असे प्रश्न मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केले. ओबीसीतूनच आरक्षण हवे मराठ्यांना मंगळवारी दिलेल्या दहा टक्के आरक्षणाचा आनंद नाही. त्या आरक्षणाचे काहीच सोयरसुतक आम्हाला नाही. २०१४ आणि २०१८ प्रमाणे या आरक्षणाचे झाले तर काय? हे आरक्षण रद्द झाले तर मुलांचे किती मोठे नुकसान होईल, हे तेव्हाच्या मुलांना माहीत आहे. आम्हाला फक्त ओबीसीतून आरक्षण हवे आहे. दहा टक्के आरक्षण तुम्ही टिकवा. पण हे ओबीसी आरक्षणही आम्हाला द्या. ओबीसी कायदा सांगतो जी जात मागास होईल, तिला ओबीसी आरक्षणात घ्यायचे असे आहे. मग मराठा मागास झाला ना? मंगळवारी सरकारने त्यासंदर्भातील अहवाल स्वीकारला ना? मग मराठा ओबीसीतून बाहेर का? आम्हाला ५० टक्क्यांच्या वरचे नाही तर ५० टक्क्यांच्या आतील आरक्षण हवे.सरकारला हरकती बघण्याची गरज नाही सरकारला हरकती बघण्याची गरज नाही. हा राज्याला आणि मंत्रिमंडळाला अधिकार आहे. हजार कर्मचारी कामाला लावून त्या हरकती मार्गी लावा. आपले आंदोलन शांततेचे असणार आहे. दहा टक्के आरक्षण देण्यासाठी सरकार गावागावांत शिबिर घेणार असल्याची माहिती मला मिळाली आहे. परंतु सरकारने ही जबरदस्ती करू नये. ज्याला कुणबी म्हणून घ्यायचे ते कुणबी म्हणून घेतील. ज्यांना दहा टक्के हवे, ते दहा टक्के म्हणून घेतील.

# २३ ते २५ फेब्रुवारी लातुरमध्ये १४ वी न्यूरोसर्जन वैद्यकीय परिषद.

**देशातील २२० न्यूरोसर्जन लावणार उपस्थिती तीन दिवसात न्यूरो मधील संशोधनाचे केले जाणार सादरीकरण मराठवाड्यातील न्यूरोसर्जनना ज्ञान आणि कार्याचा होणार फायदा.**

लातूर : - मिडवेस्ट चॅपटर ऑफ न्यूरोलॉजिकल सर्जनस महाराष्ट्र अँड गोआ,एम.सी.एन.एस २०२४ ही राज्यस्तरीय न्यूरोसर्जन वैद्यकीय परिषद लातूर येथील कार्णीवल रिसॉर्ट येथे २३ ते २५ फेब्रुवारी यादरम्यान पार पडणार आहे.देशातील ही १४ वी परिषद असून यंदाचा मान लातूरला मिळाला आहे. देशातील जवळपास २२० न्यूरोसर्जन या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत न्यूरो मधील संशोधनाचे सादरीकरण केले जाणार असून या परिषदेत जेष्ठ व प्रसिध्द न्यूरोसर्जन यांच्या ज्ञान,संशोधन आणि कार्य आणि नवनवीन संशोधनाचा फायदा मराठवाड्यासह राज्यातील न्यूरोसर्जन यांना होणार आहे.याच तीन दिवसात लातूर येथील एम.आय.टी कॉलेज मध्ये कॅडाव्हर्स (मृतदेह) मध्ये प्रॅक्टिकल वर्कशॉपचे देखील आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती या परिषदेचे आयोजन सचिव तथा लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटलचे प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉक्टर हनुमंत किणीकर यांनी दिली आहे.

आज काल सामान्य व्यक्तीला देखील न्यूरो हा विषय माहिती झालाय, दैनंदिन होत असलेले अपघात आणि कांही विशिष्ठ आरोग्याच्या समस्या पाहता न्यूरोसर्जन हा विषय दररोजचा झालाय अशीच परिस्थिती. सामन्यातील सामान्य व्यक्ती देखील या क्षेत्रापासून अपरिचित नाही हे आजचे वास्तव आहे. त्यामुळे या क्षेत्रात आज प्रचंड मोठे संशोधन सुरू असून देशातील दिग्गज न्यूरोसर्जन कायम या क्षेत्रात नवनवीन संशोधन आणि प्रयोग करत असतात.या संशोधनाचा आणि प्रसिद्ध न्यूरोसर्जन यांच्या कार्याचा लाभ महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाड्यातील न्यूरोसर्जन डॉक्टरांना व्हावा परिणामी त्याचा लाभ,फायदा रुग्णांना व्हावा या उद्देशाने लातूर येथील कार्णीवल रिसॉर्ट येथे २३ ते २५ फेब्रुवारी दरम्यान राज्यस्तरीय १४ व्या न्यूरोसर्जन वैद्यकीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.देशातील जवळपास २२० न्यूरोसर्जन या परिषदेत आपला सहभाग नोंदवणार आहेत.ज्यात आपल्या



देशातील दिग्गज आणि प्रसिद्ध न्यूरोसर्जन ज्यात हिंदुजा हॉस्पिटल,मुंबई येथील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉक्टर बी.के मिश्रा, मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलचे डॉक्टर अनिल कारापूरकर, मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलचे चंद्रशेखर देवपूजारी,के. ई. एम हॉस्पिटलचे डॉक्टर बटुक डिवोयरा,सायन हॉस्पिटल,मुंबई येथील डॉक्टर नितीन डांगे,के.ई. एम हॉस्पिटलचे डॉक्टर त्रिमूर्ती नाडकर्णी, लीलावती हॉस्पिटल,मुंबई येथील डॉक्टर अतुल गोयल,के.ई. एम हॉस्पिटल,हैदराबाद डॉक्टर मानस पनिग्रही,बेंगलोर येथील सुप्रसिद्ध डॉक्टर जी. रघुराम, तिरुवंतपुरमचे डॉक्टर सुरेश नायर, सोलापूर येथील डॉक्टर काटीकर दत्तप्रसन्न,औरंगाबाद येथील डॉक्टर मिलिंद दुनाखे आदींची विशेष उपस्थिती असणार आहे. ही परिषद महाराष्ट्र विशेषतः मराठवाड्यातील न्यूरोसर्जन यांच्यासाठी फार मोठी आणि महत्वाची किंबहुना फार मोठी पर्वणी आहे अशी माहिती या परिषदेचे आयोजन सचिव तथा मराठवाड्यातील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉक्टर हनुमंत किणीकर यांनी दिली आहे.

# खंडापूर ते मांजरा साखर कारखाना रस्त्याचे डांबरीकरण करा

लातूर :- संजय पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन खंडापुर ता. जि.लातूर हे लातूर शहरापासुन जवळ असल्यामुळे परिसरातील ऊसाची वाहतूक व औद्योगिक क्षेत्रातील जड वाहनाची वाहतूकीसाठी गावाच्या दळणवळणासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असताना या रस्त्यावरील अर्धवट राहिलेले काम व डांबरीकरण करण्यासंबंधी यापुर्वी आपल्या कार्यालयाकडे खंडापूर येथील ग्रामस्थांनी दि. ०२/११/२०२३ रोजी माझ्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले होते. तेंव्हापासुन अद्याप कुठल्याही प्रकारची कार्यवाही आपल्या कार्यालयाकडून करण्यात आली नाही. म्हणून दिनांक २१/०२/२०२४ रोजी खंडापूरचे संजय पाटील खंडापूरकर




**संजय पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांचे ठिय्या आंदोलन**

यांच्या नेतृत्वात खंडापूरच्या महिला व पुरुष असंख्य ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभाग राजीव गांधी चौक या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करून रस्त्याचे काम कधी करणार तरच आंदोलन मागे घेणार. नाही तर याच्यापेक्षा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा संजय पाटील खंडापूरकर यांनी दिला आहे.

## संपादकीय....

# वाईटांचा वसंतोत्सव!

विरोधी पक्ष म्हणून प. बंगालमध्ये भाजप हे करणारच. त्यांना तसे करण्याची संधी न देण्यात खरे शहाणपण आहे. त्याच्या अभावाचे प्रदर्शन ममताबाई सातत्याने करतात.संदेशखाली प्रकरणाची बरोबरी मणिपूरशी करण्याचा अतिउत्साही भाजप खासदारांचा प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाने हाणून पाडला असला तरी त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अजिबात कमी होत नाही. संदेशखाली हे पश्चिम बंगालची राजधानी कोलकातापासून शंभरभर किलोमीटरपेक्षाही कमी अंतरावर असलेले मागास ठिकाण. त्या परिसरात तृणमूल काँग्रेसच्या स्थानिक नेत्याने अनेक मजूर महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. त्याच्यावरील कारवाईसाठी त्यामुळे तेथे आंदोलन झाले आणि स्थानिक भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी हा मुद्दा लावून धरला. भाजपने यात विशेष लक्ष घातले याचे साधे- आणि अर्थातच महत्त्वाचे- कारण म्हणजे संदेशखाली कथित अत्याचार प्रकरणातील आरोपी. त्याचे नाव शाजहान शेख. आपल्याकडे शहरे वगळता अन्यत्र अनेक प्रांतांत स्थानिक राजकीय दांडगेश्वरांची हुकूमत असते. पक्ष कोणताही असो. सत्ताधाऱ्यांस असे दांडगेश्वर हवे असतात आणि या दांडगेश्वरांस सत्ताधार गरजेचा असतो. पश्चिम बंगालात डावे जेव्हा सत्तेवर होते तेव्हाही अशा स्थानिक दांडगेश्वरांची संख्या मुबलक होती आणि डावे जाऊन तृणमूलची सत्ता आली तरी त्यांची संख्या कमी झालेली नाही. हा शाजहान शेख या अशांतीलच एक. ही असली मंडळी आपापल्या परगण्यात एक प्रकारची खंडणीखोरीच करीत असतात आणि सत्ताधीशांचे त्यास अभय असते. या शेखास असे अभय होते असा विरोधकांचा आरोप आहे. या अभयामुळेच सदर परिसरात त्यांची दांडगाई सुरू होती. त्यातूनच दमदाटी करून त्याने आपल्या इलाख्यात काम करणाऱ्या महिलांवर लैंगिक अत्याचार केले असा आरोप आहे. त्यावरून गेले काही दिवस भाजप आणि तृणमूल पुन्हा एकदा हमरीतुमरीवर आले असून जे घडते आहे त्यावरून एक विदारक चित्र निर्माण होते.डाव्यांची दादागिरी मोडून ममता बॅनर्जी यांनी सत्ता खेचून आणली आणि नंतर तीन वेळा राखली असली तरी आपल्या राज्यात कायद्याचे राज्य निर्माण करण्यात त्यांना यश आले असे म्हणता येणार नाही. गुंडांच्या शाखांवरचा झेंडा तितका बदलला. डाव्यांच्या राज्यात 'लाल सलाम' म्हणत गुंडगिरी होत असे. ती जाऊन तृणमूलची भाषा आली इतकाच काय तो बदल. यासाठी केवळ त्या राज्यातील राजकीय पक्षांनाच दोष देणे अन्यायाचे ठरेल. यात त्या राज्यातील राजकीय संस्कृतीही तितकीच कारणीभूत आहे हे नाकारता येणार नाही. डाव्यांच्या प्रदीर्घ राजवटीमुळे असेल किंवा त्याहीआधी भारत-पाकिस्तान फाळणीतील नोआखाली अनुभवल्यामुळे असेल; त्या राज्यातील राजकारणाची रक्तरंजितता काही कमी होताना दिसत नाही. तेव्हा अशा परिस्थितीत तृणमूलच्या शाजहान शेख याने असे काही केले नसेल असे जसे छातीठोकपणे म्हणता येत नाही तसेच त्याच्याविरोधात सत्यापेक्षा कांगावा अधिक नाही, असेही म्हणता येणार नाही. त्यात सदर आरोपीचे 'शेख' असणे भाजपच्या पथ्यावर पडले असणार. गेल्या विधानसभा निवडणुकांत प. बंगालातील अल्पसंख्याकांनी तृणमूलला मोठा आधार दिला. तेव्हा त्या पक्षापासून अल्पसंख्याकांस तोडण्यासाठी या घटनेचा उपयोग करण्याचा विचार भाजप नेतृत्वाच्या मनात आला असेल तर ते प्रचलित राजकीय संस्कृतीनुसारच झाले असे म्हणता येईल. याचे कारण साध्यसाधनविवेक वा नैतिकता इत्यादी मुद्दे भाजपने या शेखाविरोधात रान उठवण्यामागे आहेत असे असते तर तृणमूलातील भ्रष्टाचारी हिंदूंना भाजपने स्वत:च्या पदराखाली घेऊन पवित्र केले नसते. पण सदर प्रकरणातील आरोपी शेख असल्याने भाजप त्यास जवळ करणे शक्य नाही आणि या अल्पसंख्याकांची तृणमूलशी असलेली जवळीक सहन करणेही भाजपस अशक्य. तेव्हा हे प्रकरण गाजणार, गाजवले जाणार हे ओघाने आलेच. तसेच झाले. प. बंगालात प्रभाव विस्तारासाठी जंगजंग पछाडणाऱ्या भाजपच्या हाती तृणमूलने हे आयते कोलीत दिले आणि भाजपने त्याचा पुरेपूर वापर केला. त्यात भाजपला दोष देता येणार नाही. सदर प्रकरणी अधिक सजगता दाखवायला हवी होती ती सत्ताधारी तृणमूलने.कारण विरोधी पक्षीयांची सत्ता असलेल्या राज्यात पराचा कावळा करण्यासाठी भाजप किती टपलेला असतो आणि त्यात भाजप-नियुक्त राज्यपाल किती उत्साही साथ देतात याचे असंख्य दाखले देता येतील. असे असताना भाजपला संधी मिळणार नाही, याची खबरदारी घेणे हे तृणमूलचे- म्हणजेच त्या पक्षाच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांचे- कर्तव्य होते. ते त्यांनी निभावले नाही. तेव्हा भाजपवर या प्रकरणी राजकारण करत असल्याच्या ममताबाईंच्या आरोपात तथ्य कमी, कांगावा अधिक आहे. एक जागरूक विरोधी पक्ष म्हणून भाजप हे करणारच. त्यांना तसे करण्याची संधी न देण्यात खरे शहाणपण आहे. त्याच्या अभावाचे प्रदर्शन ममताबाई सातत्याने करतात. भाजप अनेक अंगांनी लढतो. याआधी महुआ मैत्रा प्रकरणातही हे वास्तव दिसून आले. त्याच प्रकारे इथेही भाजपच्या संसदीय शाखेने आपल्या विशेषाधिकाराचा भंग झाल्याचे कारण पुढे करीत या प्रकरणातील चौकशी वेगळ्याच पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला. भाजप नेत्यांनी संदेशखाली येथील पीडितांच्या भेटीसाठी प्रयत्न केला असता त्यास ममता बॅनर्जी सरकारने विरोध केला, यापासून रोखले, असले थातूरमातूर कारण पुढे करत भाजप खासदारांनी केंद्रीय अन्वेषण विभागातर्फे याची चौकशी करवण्याचा घाट घातला. सर्वोच्च न्यायालयाने हा डाव उधळला. पण त्यामुळे ममताबाईंना मिळणारा दिलासा क्षणिक असेल. कारण या प्रकरणातील आरोपीस अद्यापही अटक करण्यात त्यांच्या सरकारला यश आलेले नाही. हा शेख जोपर्यंत जेरबंद होत नाही तोपर्यंत भाजप हा विषय तापवणार.परंतु तसे करण्यामागे संदेशखाली येथील अभागी महिलांची काही दयामाया भाजपस येते, त्यांच्याविषयी काही सहानुभूती आहे असा विचार करण्याची अजिबात गरज नाही. इतकी अंधभक्ती केवळ भक्तांनाच शोभेल. याचे कारण महिला अत्याचार, सार्वजनिक जीवनात महिलांचा आदर वगैरे मूल्ये भाजपकडून पाळली जात असती तर मणिपुरी महिलांच्या अब्रूचे धिंडवडे जगाच्या चव्हाट्यावर मांडले गेले नसते. संदेशखाली प्रकरणाची तुलना मणिपुरात जे घडले त्याच्याशी करण्याचा प्रयत्न काहींनी केला. ते जमले नाही. मणिपुरातील महिलांना अद्याप न्याय मिळालेला नाही; हे सत्य. इतकेच काय भाजपसाठी स्त्रीदाक्षिण्य, महिलांचा 'सम्मान' इत्यादी मूल्ये खरोखरच महत्त्वाची असती तर त्या ब्रिजभूषणाचे काय हा प्रश्न समोर येतो. कुस्ती खेळात देशाचे नाव उजळ करणाऱ्या महिला कुस्तीपटूंवर या ब्रिजभूषणाने केलेल्या अत्याचारांची दखल भाजपने किती त्वरेने घेतली हे सर्व देशाने पाहिले. तेव्हा तृणमूल काय किंवा भाजप काय! 'उडदामाजी काळेगोरे' हेच काय ते सत्य. तेव्हा हा पक्ष चांगला की तो वाईट हा मुद्दाच नाही.

# राजकारणाची बदललेली परिभाषा

बालपणापासून काँग्रेस संस्कृतीत वाढलेले आणि गेली ४० ते ५० वर्षे पक्षात कार्यरत असलेले काँग्रेस पक्षाचे दिग्गज नेते तसेच महाराष्ट्र राज्याचे दोनदा मुख्यमंत्री पद भूषविलेले अशोक चव्हाण ह्यांनी काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यात्त्वाचा तसेच आमदारकीचा राजीनामा देत अखेर भाजपात प्रवेश केला.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने सर्वांनाच राजकिय स्वातंत्र्य बहाल केले असल्यामुळे कोण कोणत्या पक्षात जातो किंवा का जातोय हे विचारण्याचा कुणाला अधिकार नाही.तो त्याचा वैयक्तिक निर्णय असतो.परंतु ते ज्या काँग्रेस संस्कृतीच्या वातावरणात वाढले,परिपक्व झाले,त्याला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय त्यांनी का घेतला ? तसेच त्यांनी ज्या पक्षात प्रवेश केला, त्याचे नेमके कारण काय ? किमान ह्याचा खुलासा करणे त्यांचे कर्तव्य होते.ज्या काँग्रेस पक्षात त्यांचे वडील शंकरराव चव्हाण स्वातंत्र्य चळवळीपासून कार्यरत होते.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री होते.अशोकराव त्यांचे सुपुत्र नसते तर त्यांना इतक्या तरुण वयात आणि संघटनेत भरीव काम न करता मंत्रिपद किंवा मुख्यमंत्री पद मिळाले असते का? म्हणुन ज्या पक्षाने त्यांना,कामगिरीच्या जोरावर नाही तर शंकररावांचे पुत्र म्हणुन सत्तेची उच्च आणि अत्युच्च खुर्चीत बसविले,त्या पक्षाचा त्याग करण्याची सबळ कारणे जाहीर केली असती तर जनतेला पडलेल्या प्रश्नांना परस्पर उत्तर मिळाले असते. परंतु भाजपा प्रवेशानंतरच्या पत्रकार परिषदेत ते एकही ठोस कारण सांगू शकले नाही.त्यामुळे जनतेच्या मनातील शंका अधिक दृढ झाली. संरक्षण विभागाच्या जमिनीवर उभारलेल्या आदर्श सोसायटीच्या घोटाळ्यामुळे त्यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला.सध्या ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून भाजपाने नुकत्याच काढलेल्या श्वेतपत्रिकेत त्याचा आवर्जून उल्लेख केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जाहीर सभेत त्याबद्दल टीका केली होती. या पार्श्वभूमीवर त्यांच्या भाजपा प्रवेशाच्या दुसर्याच दिवशी त्यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे त्यांची भाजपा प्रवेशाचे कारण स्पष्ट झाले.गेल्या काही वर्षांमध्ये विरोधी पक्षांतील राजकारण्यांवर मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळ्या संदर्भात सरकारी यंत्रणांच्या धाडी पडत आहेत.त्यापैकी काही लोकांना तुरुंगवासाचा अनुभव घ्यावा लागला तर काही चौकशीच्या फेऱ्यात अडकून बेजार झाले आहेत. ह्यातील वैशिष्ट्य म्हणजे सत्तेत असणारे किंवा त्यांना पाठींबा देणारे ह्यांच्यापैकी कुणावर अशा प्रकारची चौकशी किंवा भ्रष्टाचाराचे आरोप नाहीत. ज्या लोकांनी सत्तेचा गैरवापर करून घोटाळे केले आहेत,त्यांची पूर्णपणे चौकशी होऊन,त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाला तर त्यांना शिक्षा झालीच पाहिजे.ह्यात दुमत असण्याचे कारण नाही.परंतु अशा लोकांनी सत्ताधारी पक्षाचा झेंडा खांद्यावर घेताच, त्यांच्या मागे लागलेले चौकशीचे शुक्लकाष्ठ स्थगित झाल्याचे पाहून सर्वसामान्य माणूस बुचकळ्यात पडला आहे.

भारत हा जगातील सर्वांत मोठा लोकशाही प्रणाली असलेला देश आहे. तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानातील कायद्यानुसार चालतो.संविधानाने



धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व अंगीकारले असून त्याने स्वातंत्र्य,समता,बंधुत्त्वासह प्रत्येकाला धर्म स्वातंत्र्य,विचार स्वातंत्र्य तसेच राजकिय हक्क प्रदान केले आहेत.त्यानुसार प्रत्येक जण त्याला योग्य वाटणार्या धर्माचे,राजकिय पक्षाचे,किंवा संघटनेचे समर्थन करतो. ह्या संवैधानिक लोकशाहीने सत्ताधारी पक्षाबरोबर विरोधी पक्षाला देखील महत्वाची भूमिका बजावण्याचे तसेच चुकीच्या गोष्टींना विरोध करीत व्यक्त करीत त्याची जाहीर वाच्यता करण्याचे अधिकार दिले आहेत. ह्याचाच आधार घेत देशाने स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षात विरोधी पक्ष नेत्यांची जनहिताची आंदोलने,खरमरीत केलेली भाषणे, जनतेचे प्रश्न,विकास योजना ह्यावर अभ्यासपुर्ण केलेली निवेदने ह्या देशाने अनुभवली आहेत.त्यामुळे देशाच्या,राज्याच्या भरभराटीला,प्रगतीला,जनहिताच्या योजना पूर्णत्वास नेण्यास मदत झाली आहे.

परंतु हल्ली राजकारणाची परिभाषा बदलून गेली आहे.निव्वळ स्वहित,सत्ता,आणि त्यातून मिळणारे फायदे यासाठी राजकारणात येणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे जनहित,ध्येय,नीतिमत्ता,विचार ह्यांना गुंडाळून ठेवीत,कुणीही कोणत्याही पक्षात प्रवेश करतांना दिसतो.त्यामुळे कोण,कुठल्या पक्षात आहे? हे कळेनासे झाले आहे.राजकारणातील तत्त्व,विचारप्रणाली,समाजाप्रती असलेली त्यागयुक्त कर्तव्य भावना पूर्णता लोप पावली असून त्याची जागा स्वार्थ,कोडगेपणा,दबंगगिरी,झुंडशाही, जातींच्या राजकारणाने धुमाकूळ घातला आहे.कसे ही करून सत्तेत येणे. हे राजकारणात येण्याचे उद्दिष्ट झाले आहे.मग ती सत्ता ग्रामपंचायत,नगरपालिका,विधानसभा ते थेट लोकसभेवर निवडून येण्याची असो वा एखाद्या सरकारी महामंडळावर लावून घेण्याची असो.सध्या घराणेशाहीने राजकारणात पक्का जम बनविल्याचे चित्र आहे. त्याविषयी अधिक न बोललेले बरे.देशाने संविधानाचा स्विकार करून जवळजवळ ७० वर्षे होत आली आहेत. परंतु सत्तेच्या हव्यासापोटी गेल्या ३०/४० वर्षापासुन दलबदलू राजकारणाला उत आल्याचे दिसते. त्यामुळे राजकारणात आयाराम,गयाराम शब्द रूढ झाला आहे. त्यामुळे व्यक्ति स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य आणि राजकिय विचारधारा ह्यांची मुस्कटदाबी होत असल्याचे विदारक चित्र देशाच्या राजकीय क्षितिजावर दिसत आहे.

भारतात भिन्न विचारसरणी किंवा राजकिय भूमिकांमध्ये वैचारिक वाद ही नवीन गोष्ट नाही.परंतु त्याला तारतम्य तर होतेच त्याचबरोबर वैचारिक उंचीची पातळी होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी ह्यांच्या विचारांत टोकाची मतभिन्नता होती. परंतु त्यांनी कधीच समाजहित सोडून व वैयक्तिक फायद्यासाठी एकमेकांवर पातळी सोडून टीका केली नाही. टिळक आगरकर वाद,नेहरू,पटेल,राजेंद्र प्रसाद ह्यांच्यातील विचार भिन्नता,महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस ह्यांचे मतभेद सर्वश्रुत आहेत. त्यांचे मतभेद विचारधारेत आणि लक्ष्य स्वतंत्र भारत असल्यामुळे त्याची जाहीर वाच्यता झाली नाही. लोकसभा निवडणुक १९८४ ला अटलबिहारी वाजपेयी पराभूत झाले. तेव्हा राजीव गांधींनी तुमच्या सारखा नेता विरोधी पक्षात असणे आवश्यक आहेअसे सांगून त्यांना राज्यसभेवर निवडून आणले.महाराष्ट्राला देखील विरोधी पक्ष नेत्यांची मोठी परंपरा आहे.एस.एम. जोशी,उद्धवराव पाटील,आर.डि. भंडारे,कृष्णराव धुळप,उत्तमराव पाटील,मृणाल गोरे ह्यांच्यावर कधीच कोणत्याही प्रकारचे आरोप झाले नाही. तसेच त्यांच्या समकालीन सत्ताधाऱ्यांवर देखील असे आरोप झाले नाही.बाळासाहेब ठाकरे,शरद पवार,डि.बि.पाटील,सुशीलकुमार शिंदे, विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंढे,मनोहर जोशी ह्या सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांनी एका व्यासपीठावर आल्यानंतर,त्यांच्या भाषणातून एकमेकांवर मारलेल्या कोपरखळ्या,प्रसंगोचित घटनांचा उहापोह ह्यांनी वैचारिक उंची अधोरेखित झाल्याचे महाराष्ट्राने अनेकदा अनुभवले आहे.

मग ही राजकिय,सामाजिक परिस्थिती अशीच कायम राहणार का? असा प्रश्न सहाजिकच मनात येतो.परंतु जगात कायम परिवर्तन होत असते. ही गोष्ट विसरून चालणार नाही.ह्या देशात पूर्वापार जाती व्यवस्थेची प्रथा चालत आली होती. तेव्हा ह्या व्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांना स्वप्नातही वाटले नसेल की,या देशात छत्रपती शाहू महाराज नोकऱ्यांमध्ये आरक्षण सुरू करतील.महात्मा ज्योतीराव फुले स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवतील.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने प्रज्ञासूर्य जन्माला येऊन ही सगळी व्यवस्थाच उध्वस्त करून,या देशातील प्रत्येक नागरिकाला संविधानाने समान हक्क देऊन सगळ्यांना एका रांगेत उभे करील. त्यामुळे आपण आशावादी असणे आवश्यक आहे.ह्या परिस्थितीत देखील बदल होईल. त्यासाठी सर्वसाधारण लोकांचा उघड्या डोळ्यांनी राजकारणात मोठ्या प्रमाणात सहभाग आवश्यक आहे. ह्या देशात मध्यम वर्गाने नेतृत्व करून कैक आंदोलने यशस्वी केली आहेत. सध्या हा वर्ग अलिप्त असल्याचे दिसते. त्या वर्गाने पुन्हा एकदा राजकारणात मुसंडी मारून पुढे यायला पाहिजे. गुंडगिरी प्रवृत्तींच्या लोकांना डोक्यावर घेऊन प्रदर्शन करणे थांबवले पाहिजे. भविष्यात जेव्हा जेव्हा निवडणुकीत मतदान करण्याची वेळ येईल, त्या त्या वेळेस कोणत्याही आमिषाला बळी न पडता, त्या संधीचे सोनं करीत योग्य उमेदवाराला मतदान करून निवडून आणणे हे आपले आध्य कर्तव्य समजले पाहिजे.असे जर आपण करू शकलो तर ती पुन्हा जनहिताच्या राजकारणाची सुरुवात असेल. हे निश्चित.

**********

**जयभीम.**

**अरूण निकम.**
**९३२३२४९४८७.मुंबई.**

# सुधारणांची प्रतीक्षा

लोकसभा निवडणुकीनंतर नव्या सरकारने काही महत्त्वाच्या सुधारणांना कायदेशीर अधिष्ठान देणे आणि त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. कृषी, कामगार, भूमी आणि अन्य सुधारणांची गरज आहे. कामगार कायद्यात १९९० च्या दशकात सुधारणा करणे गरजेचे होते आणि ते आतापर्यंत झालेले नाही. अधिक रोजगारनिर्मितीसाठी अप्रेंटिस योजनांवर भर देण्याची गरज आहे. यामुळे कमी खर्चात मनुष्यबळ आणि कौशल्य मिळू शकते. शहरात अधिकाधिक रोजगार तयार करण्यासाठी केंद्र आणि राज्याच्या अधिनस्थ संस्था, नगरपालिका आणि स्थानिक संस्थांना जादा अधिकार द्यावे लागतील.९ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका ग्लोबल बिझनेस समिटमध्ये केंद्र सरकारच्या तिस-या कार्यकाळात नवा भारत वेगाने काम करेल, असा विश्वास व्यक्त केला. भारत जगातील तिसरी मोठी आर्थिक शक्ती म्हणून नावारूपास येत असल्याचे दिसत आहे. आपला आर्थिक विकासाचा दर सतत वाढत असून महसूल तूट कमी होत आहे. उत्पन्न वाढविणे आणि गरिबी कमी करण्याचा हा काळ आहे. २५ कोटी नागरिक गेल्या दहा वर्षांत गरिबीच्या बाहेर आले आहेत.मोदी म्हणाले, आपल्या सरकारने सर्व धोरणात स्थैर्य आणि सातत्य राहण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. प्रत्येक बजेटमध्ये चार गोष्टींवर अधिक भर दिला गेला. पायाभूत सुविधांचा विकास, उत्पादन वाढविण्यासंदर्भात खर्चात विक्रमी तरतूद करणे, कल्याणकारी योजना, अनाठायी खर्चांना लगाम व आर्थिक शिस्त. त्याचे उत्साहजनक परिणाम मिळाल्याचे पंतप्रधान म्हणाले. ८ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही लोकसभेत मोदी सरकारच्या कार्यकाळाची माहिती देणारी श्वेतपत्रिका मांडली. यात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दहा वर्षांत आर्थिक विकास वेगाने झाला असल्याचे म्हटले आहे. या सुधारणा जन धन योजना, आधार आणि मोबाईल आधारित अंशदान वितरणात सुधारणा (जेएएम), जीएसटी तसेच कर्जवसुली आणि वाटप सुधारणा आणि दिवाळखोरी संहिता (आयबीसी) याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. जागतिक पातळीवर प्रत्यक्ष परकी गुंतवणुकीतील घसरणीचा माहोल असताना भारत मात्र जगातील सर्वाधिक परकी गुंतवणूक मिळवणा-या देशांत सामील झाला आहे. भारताचा परकी चलनसाठा वेगाने वाढला आहे. भारतीय शेअर बाजार हा जगात सर्वांत उच्चांकी पातळीवर असल्याचे सांगत आहे.देशात २०१४ मध्ये २३४ सार्वजनिक उपक्रम होते आणि आज त्याची संख्या २५४ झाली आहे. उद्योग, कृषी, सेवा क्षेत्राचा देखील वेगाने विकास झाला आहे. भारत आर्थिक विकासासह जागतिक शक्ती म्हणूनही समोर आला आहे. जागतिक विकासाचे इंजिन म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. भारताकडे जागतिक कंपन्यांचा ओघ सुरू झाला आहे. तसेच देशाच्या विकासात आर्थिक शिस्तीने महत्त्वाची भूमिका बजावली, हे देखील पाहिले पाहिजे. जगातील प्रमुख जागतिक क्रेडिट रेटिंग संस्थांनी देखील केंद्र सरकारचे आर्थिक धोरण आणि अर्थसंकल्प हा विकासाला अनुकूल असल्याचे म्हटले आहे. यानुसार भारताचा विकास, भारतातील गुंतवणूक आणि भारताची आर्थिक स्थिती भक्कम होण्यास हातभार लागणार आहे. 'फिच'ने म्हटले, लोकसभा निवडणुकीच्या अगोदर सादर झालेल्या भारताच्या हंगामी अर्थसंकल्पात २०२४-२५ मध्ये महसूल तूट मागील दोन वर्षांच्या तुलनेत वेगाने कमी करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे.त्याचबरोबर भांडवली तरतूद देखील वाढली आहे. आता नव्या सरकारकडून सादर होणा-या संपूर्ण अर्थसंकल्पात आर्थिक सुधारणांसंबंधी पावले टाकली जातील, अशी अपेक्षा आहे. याप्रमाणे 'एस अँड पी' ने म्हटले, या काळात भारताची सॉव्हेरिन रेटिंग ही सरासरीच्या तुलनेत वरच्या पातळीवर आहे. भारताचे नवे सरकार व्यापक पायाभूत सुविधा योजनांवरील गुंतवणुकीत वाढ करून आर्थिक सुधारणा आणि अन्य भांडवली तरतुदीत भर घालेल व महसूल तूट कमी करण्यात यशस्वी ठरेल. याप्रमाणे भारताची रेटिंग आणखी सुधारेल. 'एस अँड पी'ने म्हटले, भारतात भाजपच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार पुन्हा येत असेल तर धोरणात सातत्य राहू शकते. अशावेळी लोकसभा निवडणुकीनंतर नव्या सरकारने काही महत्त्वाच्या सुधारणांना कायदेशीर अधिष्ठान देणे आणि त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. कृषी, कामगार, भूमी आणि अन्य सुधारणांची गरज आहे. कामगार कायद्यात १९९० च्या दशकात सुधारणा करणे गरजेचे होते आणि ते आतापर्यंत झालेले नाही.केंद्र सरकारने २९ कामगार कायद्यांना चार कामगार कायद्यांत परावर्तित करण्याची महत्त्वाकांक्षी योजना अस्तित्वात आणली. सरकारने इंडस्ट्रियल रिलेशन कोड २०२० ऑक्यूपेशन सेफ्टी, हेल्थ अँड वर्किंग कंडिशन कोड २०२०, कोड ऑन सोशल सिक्युरिटी, २०२० आणि वेतन संहिता कोड २०१९ हे मागील वर्षात डिसेंबरमध्ये एकावेळी लागू करण्याचे संकेत दिले.



मात्र ते अद्याप लागू झालेले नाहीत. या कायद्याच्या आधारे कामगारांना वेतनाची हमी, आरोग्य सुरक्षा आणि सामाजिक सुरक्षा देण्याच्या व्याप्तीत वाढ करण्यात आली आहे. त्यावेळी या कायद्यानुसार सध्याच्या कामगार कायद्यातील कठोरपणा कमी करणे आणि नियमांची अनिवार्यता कमी करणे यासारख्या तरतुदी केल्या असून त्यानुसार उद्योग उभारणीच्या कटकटी कमी होतील आणि एकप्रकारे रोजगारवाढीला मदत मिळेल. नव्या प्रस्तावित कामगार कायद्यानुसार कामगारांना अनेक फायदे होत असल्याचे चिन्हे असताना त्याचवेळी उद्योजकांना व्यवसाय करणे अधिक सुलभ करण्यासाठी देखील अनेक तरतुदी केल्या आहेत.सध्याच्या काळात अनेक देशांतील कंपन्या चीनमधून स्थलांतरित होत असून उद्योगपूरक कामगार कायद्याच्या आधारे त्यांना आपल्याकडे आकर्षित करू शकतो. व्हिएतनाम, बांगलादेश आणि अन्य देशांतील लवचिक कामगार कायद्यामुळे त्यांना लाभ मिळताना दिसत आहे. अशावेळी भारताच्या नव्या सरकारने देखील नवीन कामगार कायद्यातून संधी निर्माण करण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रस्तावित कामगार कायदा हा कायापालट करण्याबरोबरच कंपनी आणि कर्मचारी व सरकार या तिघांसाठी फायदेशीर राहू शकतो.

आता अधिक रोजगारनिर्मितीसाठी अप्रेंटिस योजनांवर भर देण्याची गरज आहे. अप्रेंटिसशिपमुळे कमी खर्चात मनुष्यबळ आणि कौशल्य मिळू शकते. आता शहरात अधिकाधिक रोजगार तयार करण्यासाठी केंद्र आणि राज्याच्या अधिनस्थ संस्था, नगरपालिका आणि स्थानिक संस्थांना जादा अधिकार द्यावे लागतील आणि या गोष्टीचा समावेश करावा लागेल. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हंगामी अर्थसंकल्पात नव्याने विकसित होणा-या क्षेत्रात संशोधन आणि कल्पनांना चालना देण्यासाठी एक लाख कोटी रुपये निधी उभारण्याची घोषणा केली आहे. मात्र संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रात एवढी गुंतवणूक पुरेशी नाही. भारतात संशोधन आणि विकासातील तरतूद ही अगोदरच कमीच आहे. राष्ट्रीय सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) च्या तुलनेत २०२०-२१ मधील तरतूद केवळ ०.६४ टक्के होती. जागतिक सरासरीच्या २.७१ टक्क्यांपेक्षा खूपच कमी तरतूद आहे. आपल्या देशात बड्या आयटी कंपन्या तसेच अन्य कंपन्या देखील संशोधन आणि विकासात आपल्या उत्पन्नाच्या एक टक्क्यापेक्षा कमी खर्च करतात. याउलट अमेरिका, चीन, जपान आणि जर्मनीसारख्या देशांत आयटी आणि अन्य क्षेत्रातील कंपन्यांची भरभराट होण्याचे प्रमुख कारण म्हणजे संशोधन तसेच नव्या कल्पनांना प्रोत्साहन देणे आणि अधिक खर्च करणे होय. जागतिक बौद्धिक संपदा संस्था (पेटंट)च्या ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये भारत २०२३ या वर्षात ४०व्या स्थानी आहे. यावरून भारत संशोधन आणि नावीन्यपूर्ण शोधांना प्राधान्य देण्यास खूपच मागे आहे, असे दिसते. एकुणातच तंत्रज्ञानावर सर्वकाही अवलंबून असलेल्या जगात केवळ सरकारकडून योजनांवरील खर्च वाढवणे पुरेसे नाही तर याव्यतिरिक्त भारतातील मोठ्या कंपन्यांना देखील स्वत:ची झाकून ठेवलेली मूठ उघडावी लागणार आहे.

# जेवताना टीव्ही पाहता का? लगेच थांबवा; तज्ज्ञांनी सांगितलेले दुष्परिणाम जाणून घ्या

आजच्या धावपळीच्या जगात वेळ वाचवण्यासाठी आपण एकाच वेळी अनेक कामे करण्याचा प्रयत्न करतो. आपल्यापैकी अनेक जण जेवण करताना त्यांचा आवडता कार्यक्रम टीव्ही, लॅपटॉप किंवा मोबाइलवर पाहतात, पण हे खरंच आरोग्यासाठी चांगले आहे का? न्यूट्रिशनिस्ट अपूर्वा अग्रवाल सांगतात, टीव्ही बघताना जेवण करणे आनंददायी वाटत असले तरी यामुळे तुम्ही आजारी पडू शकता. जेव्हा तुम्ही टीव्हीवरील कार्यक्रम बघताना जेवण करता, तेव्हा तुमचे मन स्थिर राहत नाही आणि तुम्ही काय खात आहात, हेसुद्धा तुम्हाला कळत नाही.

वसंत कुंज येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या न्यूट्रिशनिस्ट रूचिका जैन द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगतात, जेव्हा तुम्ही एखादा आवडता कार्यक्रम, चित्रपट बघण्यात मग्न असता तेव्हा तुम्ही शरीराच्या भूकेकडे दुर्लक्ष करता आणि जेवढी भूक लागलेली होती, त्यापेक्षा जास्त खाता; ज्यामुळे वजन वाढते आणि पचनक्रियेत अडथळा निर्माण होतो.

अपूर्वा अग्रवाल सांगतात, जेव्हा तुम्ही टीव्हीवर कार्यक्रम बघत जेवण करता, तेव्हा तुम्ही जेवणाच्या गुणवत्तेपेक्षा प्रमाणावर भर देता. कॅलरीयुक्त खाद्यपदार्थ



तुम्ही निवडता. तर याविषयी जैन सांगतात, टीव्ही पाहताना आपण अनेकदा कॅलरी, साखर, फॅट्स आणि मिठाचे प्रमाण जास्त असलेले स्नॅक्स निवडतो. जसे की चिप्स, कुकीज, सोडा यामुळे वजन वाढण्यासारख्या विविध आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात. अभ्यासाचा हवाला देऊन न्यूट्रिशनिस्ट अपूर्वा अग्रवाल सांगतात की, टीव्ही पाहताना जेवण केल्यामुळे लठ्ठपणाचा धोका वाढतो. विशेषत: मुलांमधील चयापचय क्रियादेखील मंदावते.

न्यूट्रिशनिस्ट रूचिका जैन सांगतात, आपण काय खात आहोत याकडे दुर्लक्ष करणे, पोट भरल्यानंतरसुद्धा खाणे, टीव्ही पाहताना कमी हालचाल करणे यामुळेसुद्धा लठ्ठपणा वाढू शकतो.

जेव्हा तुम्ही टीव्हीसमोर बसून खाता, तेव्हा तुमचे संपूर्ण लक्ष टीव्हीकडे असते, ज्यामुळे तुम्ही भरपूर जेवण करत असला तरी तुम्हाला कमी पोट भरल्यासारखे वाटते आणि भूक संपत नाही, असे अग्रवाल सांगतात.

टीव्ही पाहताना आपल्या आरोग्यावर परिणाम होऊ नये म्हणून न्यूट्रिशनिस्ट रूचिका जैन यांनी आरोग्यास फायदेशीर असे स्नॅक्सचे पर्याय निवडणे, जेवताना काय आणि किती प्रमाणात खात आहात याकडे लक्ष देणे आणि किती वेळ टीव्हीसमोर घालवता याचे भान असण्याचा सल्ला दिला आहे.

रूचिका जैन पुढे सांगतात, जेवण करताना लक्ष केंद्रित करून जेवण करणे आरोग्यासाठी फायदेशीर असते. जेवण करताना मन स्थिर ठेवणे आणि जेवताना प्रत्येक गोष्टीचा आस्वाद घेणे गरजेचे आहे.

जेवताना लक्ष केंद्रित करण्यासाठी खालील गोष्टी करू शकता

जेवण करण्यापूर्वी थोडा वेळ शांत बसा. दीर्घ श्वास घ्या. मन स्थिर करा आणि लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करा.

अन्नाचा रंग, चवीकडे बारकाईने लक्ष केंद्रित करा. जेवण करताना तुमच्या सर्व इंद्रियांद्वारे जेवणाचा आस्वाद घ्या.

अन्नाचा प्रत्येक घास नीट चावून खा. सावकाश जेवण करा.

जेव्हा तुम्हाला भूक लागली असेल तेव्हाच खा आणि पोट भरले की त्यानंतर खाऊ नका. यामुळे वजन नियंत्रणात राहते.

टीव्ही, फोन किंवा लॅपटॉपसमोर जेवण करणे टाळा. शांत ठिकाणी जेवण्याचा प्रयत्न करा, ज्यामुळे तुमचे लक्ष जेवणावर केंद्रित राहील.

अन्नाला नावे ठेवू नका. कोणत्याही अन्नाकडे सकारात्मक दृष्टीने पाहा.

ज्यांनी तुमच्यासाठी जेवण बनवले आहे, त्यांच्या मेहनतीचे कौतुक करा. कृतज्ञतेची भावना ठेवा.

एखादा पदार्थ खाल्ल्यानंतर तुम्हाला कसे वाटते, याकडे लक्ष द्या, त्यानुसार तुम्ही अन्नाची निवड करू शकता.

तुम्ही जेवण करण्यापूर्वी ध्यान करू शकता, त्यामुळे तुम्हाला जेवताना फ्रेश वाटेल.

# १७ लाख ४२ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू वाहनासह जप्त. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :- १७ लाख ४२ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू वाहनासह जप्त. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई. या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवित आहेत.




अवैध धंद्याची माहिती काढत असताना दिनांक २१/०२/२०२४ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास पोलीस पथकास खात्रीशीर माहिती मिळाली की, लातूर शहरातील बसवेश्वर चौकामध्ये एका वाहनांमध्ये काही इसम प्रतिबंधित गुटका व सुगंधित तंबाखूची चोरटी विक्री व्यवसाय करण्यासाठी वाहनातून घेऊन जाणार आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर माहितीची शहानिशा करून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी व अमलदारांच्या पथकाने दिनांक २१/०२/ २०२४ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास बसवेश्वर चौक रिंग रोड येथे सापळा लावून गुटख्याची वाहतूक करणाऱ्या वाहनास ताब्यात घेऊन पाहणी केली असता त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेले वेगवेगळ्या कंपनीचे,महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित असलेले गुटका व सुगंधित पानमसाला असा एकूण ११लाख ४२ हजार ८७२ रुपयांचा प्रतिबंधित गुटका व सुगंधित पान मसाला तंबाखू व सदर मालाची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेली स्कार्पिओ कंपनीची सहा लाख रुपये किमतीची गाडी असा एकूण १७ लाख ४२ हजार ८७२ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

त्यावरून पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे प्रतिबंधित गुटका व सुगंधित तंबाखूची अवैधरित्या वाहतूक करीत असताना मिळून आलेले इसम नामे उमर इस्माईल शेख,वय ३४ वर्ष, राहणार खोरी गल्ली, लातूर, शेख आफताब मेहमूद,वय ३८ वर्ष,राहणार खोरी गल्ली, लातूर. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे विवेकानंद चौक पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांचे नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकटेश पल्लेवाड, पोलीस अमलदार राहुल सोनकांबळे, मोहन सुरवसे, नितीन कठारे, मनोज खोसे,राहुल कांबळे यांनी पार पाडली.

# भ्रष्टाचा-यांचा एकच नारा.. तुरुंगापेक्षा भाजप बरा

कोल्हापूर : काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण भाजपमध्ये गेल्याचे मला अजिबातच आश्चर्य वाटले नाही. कारण भाजपने काढलेल्या श्वेतपत्रिकेत आदर्श प्रकरणात त्यांचे नाव आले होते. त्यामुळे 'भ्रष्टाचा-यांचा एकच नारा..तुरुंगापेक्षा भाजप बरा' असे आता लोकच म्हणू लागल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी बुधवारी येथे पत्रकार परिषदेत केली.एका बाजूला 'अबकी बार..चार सौ पार'ची गॅरंटी दिली जात असतानाच त्याचवेळेला विविध पक्षांचे नेते भाजपमध्ये घेतले जात आहेत. कारण त्यांना लोकसभा निवडणुकीतील यशाबद्दल खात्री वाटत नाही. त्या अस्वस्थतेतूनच ते असे करत असल्याचे पवार यांनी सांगितले.शेतीच्या प्रश्नांबाबत केंद्र सरकारचे धोरण धरसोडवृत्तीचे असल्याची टीका पवार यांनी केली. ते म्हणाले, कांद्यावरील निर्यातबंदी नुकतीच सरकारने



उठवली. कांदा पिकवणारा शेतकरी हा लहान आणि जिरायती शेती करणारा आहे. त्याला चार पैसे मिळायची वेळ येते तेव्हा केंद्राने त्यावर बंदी घातली. इथेनॉल प्रकल्पाची उभारणी केल्यावर त्याच्या उत्पादनावर निर्बंध आणले. सरकार दर पंधरा दिवसांला धोरण बदलत असल्याची टीका पवार यांनी केली.सुप्रिया लोकसभा लढवते मुलीला मुख्यमंत्री करण्यासाठी पवार यांची धडपड असल्याची टीका भाजप नेते अमित शहा करतात पण सुप्रिया लोकसभेत काम करते हे त्यांना कदाचित माहीत नसावे असा टोला त्यांनी लगावला. बारामती मतदार संघातून चर्चा काहीही असली तरी अजून विरोधकांनी कुणाच्याही नावांची अधिकृत घोषणा केलेली नाही. ती करतील तेव्हा पाहू असे सांगून त्यांनी सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीबाबत बोलणे टाळले.

# विद्यापीठातील विविध समस्या बाबत अभाविपचे विद्यापीठ प्रशासनाला निवेदन

लातूर / प्रतिनिधी आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर महानगराच्या वतीने विद्यापीठातील विविध समस्या बाबत अभाविपकडून विद्यापीठ प्रशासनाला निवेदन दिले आहे.

लातूर शहरातील विविध महाविद्यालयाच्या प्राचार्या मार्फत तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र पेठ येथील संचालक प्रा.राजेश शिंदे यांच्या मार्फत कुलगुरूंना निवेदन देण्यात आले.यामध्ये विद्यार्थी परिषदेने प्रामुख्याने तीन मागण्या या मध्ये केल्या आहेत. सध्या मराठवाड्यामध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे विद्यापीठाने चालू सत्राचे परीक्षा शुल्क व आगामी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे



शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे.ज्या विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकन चे फॉर्म भरले आहेत अश्या विद्यार्थ्यांचे निकाल येत्या १५ दिवसाच्या आत निकाल लावावे. पुनर्मूल्यांकना मध्ये ज्या विद्यार्थ्याचे गुणांमध्ये बदल झाला अश्या विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे शुल्क परत करण्यात यावे. अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आले आहे. यावेळी अभाविप महानगरमंत्री सुशांत एकोर्गे असे म्हणाले विद्यापीठाचे निकाल वेळेवर लागले नसल्यामुळे विद्यार्थ्या मध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.पुनर्मूल्यांकन व फेरपरीक्षा याचे फॉर्म एकदाच भरून घेतले जात आहेत पुनर्मूल्यांकनाचे निकाल वेळेवर लावून मगच फेरपरीक्षा फॉर्म भरून घेतले जावे व विद्यार्थ्यांची आर्थिक लूट विद्यापीठाने करू नये. की जर वरील मागण्या लवकरात लवकर मान्य कराव्यात अन्यथा विद्यापीठ प्रशासनाला विद्यार्थ्यांच्या तीव्र रोषास सामोरे जावे लागेल असा इशारा त्यांनी दिला.यावेळी पश्चिम नगर मंत्री सागर वाडीकर ,सहमंत्री तेजुमई राऊत,अभिजित बोरोळे, चैत्यन चेलकर, नागेश पाटील,प्रवीण शिंदे,राम जाधव,अक्षय स्वामी व इतर विद्यार्थि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गर्भावस्थेत जास्त चालण्याचे आहेत अनेक तोटे, अशी घ्या काळजी

गर्भधारणेदरम्यान चालणे खूप चांगले आहे. यामुळे गर्भवती महिलेच्या आरोग्यासाठी अनेक फायदे होतात. रोग आणि प्रतिबंध केंद्रे शिफारस करतात की प्रत्येक गर्भवती महिलेने फिरायला हवे. गर्भधारणेच्या पहिली, दुसरी किंवा तिसरी तिमाही असो. गर्भधारणेदरम्यान कोणत्याही अवस्थेत चालण्याचा सोपा व्यायाम अनेक फायदे देतो.तज्ज्ञांच्या मते, दररोज ३० मिनिटे व्यायाम किंवा चालण्याने शरीराला अनेक फायदे मिळतात, स्नायू ओपन होतात आणि चांगले वाटतात हार्मोन्सही बाहेर पडतात. असे पाहिले, गर्भवती महिलांसाठी चालणे खूप फायदेशीर आहे का?पण, इथे प्रश्न पडतो की गरोदरपणात खूप चालणे फायदेशीर आहे का? किंवा त्यामुळे स्त्रीचे काही नुकसान होऊ शकते का? याबाबत शारदा हॉस्पिटलच्या स्त्रीरोग विभागाच्या युनिट हेड, प्रोफेसर आणि वरिष्ठ सल्लागार डॉ. रुची श्रीवास्तव यांच्याशी चर्चा केली.गरोदरपणात जास्त चालण्यामुळे नुकसान होऊ शकते. हे खरे आहे की गर्भधारणेदरम्यान स्त्रीने चालले पाहिजे. हे पेल्विक एरियाचे स्नायू उघडते. त्यामुळे प्रसूतीमध्ये कमी अडचणी येतात. एवढेच नाही तर काही वेळा चालणे देखील नॉर्मल डिलिव्हरीला सपोर्ट करते.पण, याचा अर्थ असा नाही की स्त्रीने सतत चालत रहावे. आम्ही तुम्हाला सांगतो की प्रत्येक गर्भवती महिलेने तिच्या पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या तिमाहीनुसार चालले पाहिजे. जर तुम्ही पहिल्या तिमाहीत असाल तर तुम्ही आठवड्यातून पाच दिवस दररोज ३०-३५ मिनिटे चालू शकता. त्याच वेळी, जर आपण तिसऱ्या तिमाहीबद्दल बोललो तर, आठवड्यातून पाच दिवस फक्त १० मिनिटे चालणे देखील आरोग्यासाठी चांगले मानले जाते. परंतु, यापेक्षा जास्त चालणे गर्भवती महिलेच्या आरोग्यास हानी पोहोचवू शकते. स्नायूंवर परिणाम होऊ शकतो आणि हाडांवर दबावही निर्माण होऊ शकतो.गरोदरपणात जास्त चालण्याचे तोटे गरोदरपणात जास्त चालण्याने स्त्रीला थकवा जाणवू शकतो.अती चालण्यामुळे पेल्विक एरियावर दबाव येतो आणि वेदना वाढू शकतात.गरोदरपणात जास्त चालण्याने मांड्या आणि पायांच्या तळव्यांत वेदना वाढू शकतात. गरोदरपणात जास्त चालण्यामुळे सांधेदुखीचा धोका वाढतो.

# कॉ. वृंदा करात यांची २२ रोजी किनवट येथे जाहीर सभा

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी २२ पेब्रुवारी रोजी माकपा नांदेड जिल्हा कमिटीच्या वतीने भव्यरॅली व जाहीर सभेचा एल्गार पुकारलेला आहे. किनवट येथिल हु.गॉडराजे शंकरशहा मैदानावर सभेला माजी खासदार तथा माकपा पॉलिटब्युरो सदस्या कॉ. वृंदा करात आणि पॉलिटब्युरो सदस्य तथा किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉ. डॉ. अशोक ढवळे मार्गदर्शक आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावर केंद्रीय कामगार आणि किसान मोचनि हा पुकारलेला एल्गार प्रशासनासाठी लक्षवेधी ठरणार आहे. माकपाच्या किनवट व माहूर तालुका कमिटीच्या वतीने कॉ. अर्जून आडे व कॉ. शंकर सिडाम यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होणाऱ्या एल्गाररॅली जाहीर सभेच्या केंद्रस्थानी शेतकरी, कामगार, कष्टकरी, युवक यांचे ज्वलंत प्रश्न आणि मुख्येत्वे करुन हितावह ठरणारे उच्चपातळी बांधारे उभारावीत. शेतक-यांच्या ताब्यात असलेल्या गायरान जमिनी त्यांच्या



नावे करा. घरकुलांचाही प्रश्न निकाली काढून तुटपुंजे अर्थसहाय न देता दहा प्रती लाभार्थ्यांस लाखापर्यंत अनुदान रक्कमेत तरतूद करावी. इंदिरा गांधी, संजय गांधी, श्रावणबाळ, दिव्यांग, भूमिहीन, निराधार, जेष्ठ नागरीकांना दरमहा पाच हजार रुपये पेन्शनची तरतूद किनवटला जिल्ह्याचा आणि मांडवी, इस्लापूरला तालुक्याचा दर्जा मिळावा या विषयक मागण्या आहेत. पैनगंगेवरील निम्न चिमटा धरण रद्द करुन शेतकऱ्यांच्या हमी भाव आणि खरेदीची हमी देणारा गॅरंटी कायदा करून कमी दराने खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यावर गंभीर कारवाई करा. सर्वकश पिकविमा योजना शेतकऱ्यांसाठी लागू करा. सरसगट कर्ज माफी आणि तिन लाखापर्यंत बिनव्याजी कर्ज देण्याची व्यवस्था करावी. पेसा कायद्याची प्रभावी अमंलबजावणी करावी. अशा विविध मागण्यांचा या एल्गारमध्ये समावेश झालीच पाहिजे. शेतीमालाला असल्याचे कळविण्यात आले.

# राजीव गांधीं चौक लातूर येथे तमनप्पा रामपुरे यांच्या हस्ते महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालक सेनेच्या नामफलकाचे अनावरण





लातूर : - महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालक सेनेच्या नामफलकास श्रीफळ महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालक सेनेचे लातूर जिल्हा अध्यक्ष त्र्यंबक गुरुनाथ स्वामी यांच्या हस्ते फोडण्यात आले. त्या प्रसंगी महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालक सेनेचे लातूर उपाध्यक्ष विनोद मोरे, सचिव बंडुसिंग भाट व सर्व रिक्षा चालक उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालक सेनेच्या राजीव गांधीं चौक शाखाध्यक्षपदी - महादेव देशमुख, उपाध्यक्षपदी नवनाथ कावीले व दयानंद बनसोडे, कोष्याध्यक्षपदी महादेव गीरी, सचिवपदी राहुल कांबळे, सहसचिवपदी बलभीम सुर्यवंशी, कार्याध्यक्षपदी विशाल जाधव सह कार्याध्यक्षपदी नवनाथ सुळ सल्लागारपदी सागर काळे, सह सल्लागारपदी अशोक हजारे यांची निवड करण्यात आली.

# इयत्ता बारावी परीक्षेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या शुभेच्छा





लातूर दि. २१ (जिमाका): इयत्ता बारावीची परीक्षा बुधवारपासून सुरु झाली. यानिमित्ताने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दयानंद महाविद्यालय येथील परीक्षा केंद्रावर जावून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. तसेच त्यांना गुलाबपुष्प देवून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. बारावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यतील महत्वाचा टप्पा आहे. या परीक्षेचे कोणतेही टेन्शन न घेता विद्यार्थ्यांनी संयमाने परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले. तसेच विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. दयानंद महाविद्यालयाच्या नियामक मंडळाचे सदस्य विशाल अग्रवाल, त्यांच्या पत्नी श्रीमती स्मिता अग्रवाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व त्यांच्या पत्नी श्रीमती जयमाला गायकवाड, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा केंद्र प्रमुख अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे यावेळी उपस्थित होते.

## वाईट कोलेस्ट्रॉलच्या समूळ नाशासाठी सकाळी घ्या 'हे' पेय; त्रास झटक्यात होऊ शकतो कमी

बदललेली जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या अयोग्य सवयींमुळे सध्या कोलेस्ट्रॉलची समस्या वाढली आहे. वाढलेलं कोलेस्ट्रॉल ही एक गंभीर समस्या आहे. कोलेस्ट्रॉल हा मेणासारखा पदार्थ आहे, जो रक्ताच्या नसांमध्ये आढळतो. कोलेस्ट्रॉल तुमच्या यकृतामध्ये तयार होते, परंतु काही वेळा ते तुम्ही खाल्लेल्या अन्नामुळेदेखील तयार होते. त्यामुळे जर तुम्हाला निरोगी राहायचे असेल तर शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी राखणे गरजेचे आहे. कोलेस्ट्रॉलचे दोन प्रकार आहेत, चांगलं आणि वाईट कोलेस्ट्रॉल. शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल वाढल्यानं हृदयविकाराचा धोका वाढतो. तर, चांगलं कोलेस्ट्रॉल शरीरासाठी खूप महत्त्वाचं आहे.कोलेस्ट्रॉल नियंत्रणात आणण्यासाठी अनेक लोक विविध उपाय आणि औषध उपचारांचा अवलंब करतात, परंतु तुम्ही खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये काही बदल करूनदेखील कोलेस्ट्रॉल सहजपणे नियंत्रणात आणू शकता. कोलेस्ट्रॉलची पातळी राखण्यासाठी सकस आहार घेणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्ही तुमच्या आहारात विविध आरोग्यदायी पेयेदेखील समाविष्ट करू शकता, असे उजाला सिग्नस ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या आहारतज्ज्ञ एकता सिंघवाल यांनी सांगितल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.

आहारतज्ज्ञ सांगतात, निरोगी पेशी तयार करण्यासाठी तुमच्या शरीरात कोलेस्ट्रॉल आवश्यक असते. मात्र, जर तुमच्या शरीरात कोलेस्ट्रॉल जमा झाले तर त्याचाही नकारात्मक परिणाम होऊ शकतो. कोलेस्ट्रॉल दोन प्रकारचे असते : उच्च घनता लिपोप्रोटीन (एचडीएल किंवा चांगले कोलेस्ट्रॉल) आणि कमी घनता लिपोप्रोटीन (एलडीएल किंवा खराब कोलेस्ट्रॉल). एचडीएल तुमच्या पेशींचे आरोग्य राखते, तर एलडीएल तुमच्या धमन्यांमध्ये जमा होते, ज्यामुळे तुमच्या हृदयविकाराचा धोका वाढतो.

# जनतेच्या प्रश्नासाठी शिवसेना भविष्यात निलंगा येथे सक्षम विरोधी पक्षाची भूमिका वठविणार - सोमनाथ स्वामी डिगोळकर

लातूर : निलंगा विधानसभा मतदार संघात गत अनेक वर्षापासून केवळ एकाच कुटूंबाची व दोन राजकीय पक्षाची एकाधिकारशाही, घरानेशाही राहिलेली असून मिळतेजुळते राजकारण करून एकूण सामान्य जनतेला झुलवत ठेवत जनतेच्या मुलभूत समस्या व महत्वाच्या विकासप्रश्नी बगल दिलेली असून अद्याप जनतेची मुलभूत प्रश्न सुटलेले नाहीत. आजही निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ तालुक्यात गावागावाला जोडणारे रस्ते नाहीत. अपुर्या सिंचनाच्या सुविधा नाहीत अशा बाबीकडे तीन टर्म भाजपा आमदार राहिलेल्या नेत्यांनी जाणीवपुर्वक दुर्लक्ष केलेले दिसते. खरे पाहता जनतेसाठी विरोधी पक्षात सक्षम विरोधी पर्यायच उभे टाकु देऊ शकले नाहीत हीच खरी शोकांतीका असून याची उणीव निश्चितच पुढील काळात प्राधान्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांचा पक्ष भरून काढणारा असून नुतन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. दिनकरराव माने व जिल्हा समन्वयक मा. पप्पुभाई कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली निलंगा विधानसभा मतदार संघात कडवी भगवी लाट निर्माण करून तमाम जनतेच्या प्रश्नासाठी सक्षम विरोधी पक्षाची भूमिका शिवसेना वठविणार असल्याचे मत निलंगा विधानसभा प्रमुख एक कडवे शिवसैनिक सोमनाथ स्वामी डिगोळकर यांनी निलंगा येथे जेष्ठ शिवसैनिक लिंबनमहाराज रेशमे यांच्या निवासस्थानी निलंगा विधानसभा मतदार संघातील विविध ज्वलंत प्रश्नावर चर्चा करतांना मांडले. यावेळी जेष्ठ शिवसैनिक लिंबन महाराज रेशमे व डिगोळकर यांच्यात या भेटी दरम्यान निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील अनेक महत्वाच्या विकासबाबीवर सखोल चर्चा झाली. सध्या ग्रामीण भागासाठी जनतेला दळण वळणासाठी महत्वाची भेडसावणारी समस्या ही गावे जोडणारे रास्ते व शेतीसाठी पाणंदरस्ते हे प्रामुख्याने आहेत. सदर रस्ते निर्माणसाठी माजी मुख्यमंत्री व शिवसेनेचे पक्षप्रमुख मा. उद्धवसाहेब ठाकरे यांनी मातोश्री महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना प्राधान्याने हाती घेऊन भरमसाठ निधीची तरतुद करून खेड्यातील अनेक रस्ते मजबुत व्हावे म्हणून एक कि.मी.साठी २५ लाखाचा भरघोस निधी राखीव ठेवला व सदर रस्ते मागील शासन काळात मोठ्या प्रमाणावर दर्जेदारपणे झाली परंतू सध्याच्या सत्तेतील आमदाराच्या दुर्लक्षामुळे निलंगा विधानसभा मतदार संघात चांगले रस्ते न होता विकास निधीच्या नावाखाली लुटमार कैलेली आहे तसेच शेतकर्यांसाठी सामान्य जनतेसाठी अनेक योजना राबवित असल्याची जाहिर करून या विद्यमान शासनाने



प्रत्यक्षात सदर योजना या कागदावरच राबवत असल्याचे दिसते. त्याच बरोबर मतदार संघात सार्वजनिक बांधकाम विभागातील रस्ते तसेच दुरूस्तीचे काम ही निकृष्ठ दर्जाचे होत असून केवळ भाजपा कार्यकर्त्यांना पोसण्यासाठी, खुष करण्यासाठी हा विकासनिधीचा दुरूपयोग केला जात आहे. या व इतर ग्रामीण भागातील ज्वलंत प्रश्नावर शिवसेना आमागी काळात आवाज उठविणार असून तमाम शेतकरी व जनतेच्या प्रश्नासाठी कठोर भूमिका घेऊन सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी गोरगरीबाच्या कल्याणासाठी व आमदाराच्या निष्क्रिय कारभाराविरोधात शिवसेना आगामी काळात आवाज उठविणार असून तमाम शेतकरी व जनतेच्या हितासाठी कठोर भूमिका घेऊन आक्रमकपणे शिवसेना, शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांना सोबत घेऊन प्रशासन व राज्य सरकारला जाब विचारण्यासाठी भविष्यात भगवी लाट उभारणार असल्याचे शेवटी बोलतांना नमुद केले.

## घरगुती वादातून गॅस सिलिंडर लीक करून पत्नी-मुलांना जाळण्याचा प्रयत्न

नागपूर : घरातील किरकोळ वादातून संतापलेल्या एका व्यक्तीने चक्क आपल्या पत्नी आणि मुलांना एका खोलीत बंद करून गॅस सिलिंडर लीक करत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मात्र, त्यांच्या पत्नीने वेळीच समयसूचकता दाखवत आरडाओरड करत ही बाब पोलिस आणि नातेवाईकांच्या लक्षात आणून दिल्यामुळे पुढील मोठा अनर्थ टळला आहे. ही थरारक घटना नागपूरच्या कोराडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ओमनगरमधील जगनाडे ले-आऊट भागात घडली आहे. दरम्यान रंजन गणेशप्रसाद शाव (वय ४३, रा. युनिक शैलपुत्री अपार्टमेंट), असे अटकेतील संशयित आरोपीचे नाव आहे. तर रंजनच्या पत्नी मीनू (वय ४३), त्यांचा १४ वर्षीय मुलगा आणि आठ वर्षीय मुलगी, अशी थोडक्यात बचावलेल्यांची नावे आहेत. प्राथमिक माहितीनुसार, रंजन हे एका को-ऑपरेटिव्ह बँकेत मुख्य लिपिक म्हणून कार्यरत आहे. त्यांचा तापट स्वभाव असल्याने यापूर्वी देखील त्यांचा आपल्या पत्नीसोबत वाद झाला होता. त्यानंतर हा वाद विकोपाला जाऊन रंजन यांनी आपल्या पत्नी मीनूला मारहाण देखील केली होती. मात्र सोमवारच्या दुपारी त्यांच्यात परत एकदा काही कारणावरून वाद उफाळून आला.त्यानंतर रंजन यांनी रागाच्या भरात घरातील गॅस सिलिंडरचा पाईप काढला आणि पत्नी मीनू आणि त्यांच्या दोन मुलांना एका खोलीत डांबले. त्यानंतर हातात माचिस घेऊन रंजन यांनी 'तिघांना संपवूनच टाकतो' अशी धमकी दिली. अल्पावधीतच घरभर गॅस पसरला आणि भीतीपोटी मीनू आणि त्यांच्या दोन मुलांनी आरडाओरड सुरू केली.

# सातपुडा वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलनाचे वरवट बकाल येथे आयोजन



वरवट बकाल (प्रतिनिधी) :- बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात वरवट बकाल येथे अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन महामंडळाचे तिसरे वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. स्थानिक सातपुडा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था या संमेलनाचे आयोजन करणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ भोजणे यांनी दिली.सदर संमेलन हे १६ आणि १७ मार्चला आयोजित करण्यात आले आहे.या संदर्भात सातपुडा प्रतिष्ठानच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक नुकतीच वरवट बकाल येथे संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी महामंडळाच्या अध्यक्ष डॉ.सीमा मेश्राम होत्या. यावेळी त्यांनी सुदृढ सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणासाठी साहित्य संमेलनाची आवश्यकता प्रतिपादन केली. महामंडळाचे निमंत्रक प्रशांत वंजारे यांनी सुद्धा आयोजनासंबधी मार्गदर्शन केले. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून कार्यकर्ते कामाला लागले आहे. यावेळी वामनराव ढगे,अमोल भिलंगे,ड विश्वजीत वानखडे, सदानंद इंगळे,अभयसिंह मारोडे,शाहीर नागोराव इंगळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ.पुराणे यांना सामाजिक कार्यातील शिवछत्रपती पुरस्कार जाहीर....

मुरूम :- येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ.रामलिंग काशिनाथ पुराणे यांना संजीवनी फाऊंडेशनच्या वतीने देण्यात येणारा शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४ जाहीर झाला आहे. डॉ.पुराणे यांना सामाजिक कार्यातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. डॉ.पुराणे यांचे जनसामान्यांच्या न्याय हक्कासाठी पन्नासहून अधिक यशस्वी आंदोलने झाले आहेत. तालुका,जिल्हा,राज्य,राष्ट्रीय पातळीवर त्यांचे यशस्वी आंदोलने झाले आहेत. राज्यातील धाराशिव,पुणे,वर्धा,मुंबई येथील आझाद मैदान, दिल्ली येथील जंतरमंतर मैदानात त्यांचे यशस्वी आंदोलने झाले आहेत. बेरोजगार, कष्टकरी, शेतकरी, आरोग्यविषयक सह समाजातील सर्व घटकातील नागरिकांसाठी न्याय मिळवून देण्यासाठी त्यांचे संघर्ष कायम चालू असते. उमरगा तालुक्यातील ग्रामीण भागातील मुरूम याठिकाणी एका सामान्य भूमिहीन शेतमजूर यांच्या घरी त्यांचा जन्म जरी झाला असून तळागाळातील सामान्य नागरिकांचे समस्यांचे त्यांना जाण आहे आणि त्याचेच रूपांतर एका आंदोलनकारी संघर्षात झाला. उमरगा तालुक्यातील शकेडो नागरिकांना रेशन कार्ड असून धान्य मिळत नव्हते, अनेक नागरिकाजवळ रेशनकार्ड नव्हते अशा जनसामान्यां नागरिकांसाठी त्यांनी लढा उभा करून त्यांना स्वखर्चाने शासन दरबारी पाठपुरावा करून धान्य व रेशन कार्ड मिळवून दिले. राज्यातील होमगार्ड समस्या विषयीचे त्यांचे आंदोलन राज्यात आणि दिल्ली येथे गाजले आहेत आणि त्या आंदोलनाच्या माध्यमातून जीवन बिमा, त्यांची पदे, अपात्र होमगार्डना पूर्वरत कामावर रुजू करून घेतले असून त्यांचा ब्रिटिश कालीन कायद्यात बदल होण्यासाठी दिल्ली आणि मुंबई सरकार कडे पाठपुरावा चालू आहे. डॉ.पुराणे यांना आतापर्यंत सामाजिक कार्यातील डॉक्टरेट,समाजभूषण, कोरोना योद्धा, जननायक,समाजचिंतक, लोकतंत्र के प्रहरी अशा विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संजीवनी फौंडेशनच्या वतीने त्यांना २०२४ चा शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे पत्र संस्थेचे चेअरमन डॉ. ज्ञानेश्वर सानप यांनी पत्राद्वारे कळविले



आहे. दि.०२ मार्च रोजी राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, विधान परिषद सदस्य आमदार सत्यजित तांबे,शिर्डीचे माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, खासदार सदाशिव लोखंडे, अकोले मतदार संघ आमदार किरण लहामटे,पद्मश्री महाराष्ट्र भूषण त्यात्याराव लहाने, कॉंग्रेस कमिटी महासचिव उत्कर्षताई रुपवते, संगमनेर नगर परिषद माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे,युवानेते विवेक कोल्हे,कृष्णराज महाडिक या मान्यवरांच्या उपस्थितीत मालपाणी हेल्थ क्लब संगमनेर याठिकाणी सन्मानित करण्यात येणार आहे. मुरूम शहर व परिसरात त्यांच्या निवडीबद्दल अभिनंदन केले जात आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE